प्रति,

**मा. भागधारक बंधू आणि भगिनी,**

मे. विशालसागर होम अॅण्ड अॅग्रो प्रोडक्टस लिमिटेड, धुळे. **दि. २१/०८/२०२२**

**विषय:** भारत सरकार यांचे दि. १०/०९/२०१८ राजपत्रानुसार, आपले मूर्त रुप असलेले शेअर्स (कागदरुपी समभाग) हे डिमॅट रुपात (अमूर्त / इलेक्ट्रॉनिक रुपात) करुन पूर्तता करणे बाबत ....

**मा. भागधारक बंधु आणि भगिनींनो,**

सप्रेम नमस्कार !

सदर पत्राद्वारे कळविण्यात येते की, मे. कार्पोरेट कार्य मंत्रालय, भारत सरकार, यांनी आपल्या दिनांक १०/९/२०१८ रोजीच्या राजपत्राव्दारे भारतातील सर्व 'पब्लिक लिमिटेड' कंपन्यांना, ज्या शेअर बाजारपेठेत अनोंदणीकृत/असूचीबध्द आहेत, अश्या सर्व कंपन्यांना आपले भौतिक / मूर्त रुप असलेले शेअर्स (कागदरुपी समभाग) हे डिमॅट रुपात (अमूर्त / इलेक्ट्रॉनिक रुपात) करुन पूर्तता करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर राजपत्रानुसार दि. १०/०२/२०१८ पासून सर्व समभागाचे व्यवहार (खरेदी-विक्री) हे अमूर्त रुपात (डिमॅट अकाऊंट) व्द्वारेच केले जातील.

सदर प्रक्रियेमध्ये दोन भाग आहेत -

1) मे. विशालसागर होम अॅण्ड अॅग्रो प्रोडक्टस लिमिटेड यांचे मार्फत होण्याची प्रक्रिया / कामे -

i) कंपनीने, NSDL अथवा CDSL, या Depository पैकी एकास कराराकरुन Depository म्हणून नेमणे. सदर Depository ही एका बँकेप्रमाणे, कंपनीतील सर्व समभागांचे लेखा-जोखा बघण्याचे काम करते. तसेच सदर Depository नेमण्यासोबत एका RTA Agent ला नेमणे आवश्यक आहे. सदर RTA Agent ही Depository आणि कंपनी यांचेतील एका दुआप्रमाणे, सर्व कामे वार्षिक तत्वावर बघण्याचे काम करते.

- **आपल्या कंपनीने, CDSL ला Depository म्हणून नेमले आहे व CVL (CDSL ventures Limited) या कंपनीला RTA Agent म्हणून नेमले आहे.**

ii) वरील दोन्ही नेमणूकीनंतर व इतर कागदपत्रांची पूर्ततेनंतर Depository मार्फत कंपनीस एक अव्दीतीय असा ISIN नंबर प्राप्त होतो. तसेच RTA Agent यांना कंपनी कडून दिलेल्या अद्ययावत समभागाची तपशीलवार यादी दिल्यानंतर सर्व समभाग हे मूर्त रुपातून, अमूर्त रुपात (Demat) रुपांतरीत केले जातात व कंपनीच्या ISIN नंबरशी संलग्न केली जातात.

- **आपल्या कंपनीने, ISIN नंबर प्राप्त केला असुन त्यास क्र. INE0CYE01018 असा आहे.**

2) भागधारक यांचे मार्फत होण्याची प्रक्रिया / कामे -

सदरचे dematerialised share (अमूर्त समभाग) डिमॅट अकाऊंटमध्ये जमा करण्याकरीता आपणास डिमॅट अकाऊंट उघडून आपल्या मूर्त शेअर्सची (समभागची) माहिती, आपल्या शेअर्स ब्रोकरला कळविणे आवश्यक आहे. त्यानंतर, सदरची माहिती आपल्या शेअर्स ब्रोकरमार्फत डिपॅाझिटरी कडे पाठविण्यात येते व त्यानंतरच सदरचे शेअर आपल्या डिमॅट अकाऊंट मध्ये जमा होतात आणि आपणास आपल्या समभागांचे व्यवहार / हस्तांतरण करता येते.

i) डिमॅट / ट्रेडिंग अकाऊंट उघडणे (डिमॅट असल्यास नविन अकाऊंट उघडणे आवश्यक नाही)

ii) आपल्या शेअर्सची (समभागाची) माहिती DRF – Dematerialisation Request Form द्वारे, आपल्या शेअर्स ब्रोकर मार्फत Depository (CDSL) ला कळविणे.

तरी सर्व भागधारक बंधू आणि भगिनींना विनंती की, आपण आपले भौतिक / मूर्त रुप असलेले शेअर्स (कागदरुपी समभाग) हे डिमॅट रुपात (अमूर्त / इलेक्ट्रॉनिक रुपात) करुन पूर्तता करावी. कळावे, आभारी आहे.

**मे. विशालसागर होम अॅण्ड अॅग्रो प्रोडक्टस लिमिटेड,**
**चेअरमन**

| डिमॅट रुपात (इलेक्ट्रॉनिक रुपात) शेअर्सचे फायदे – |
|---|
| १) इलेक्ट्रॉनिक रुपातील शेअर्स केल्यास कागदी खोटे/बनावट शेअर्सचे व्यवहार करणे अशक्य होते.<br>२) शेअर्स व्यवहाराकरीता, इलेक्ट्रॉनिक रुपातील शेअर्स नोंदणीकरीता कोठे पाठविण्याची आवश्यकता नाही.<br>३) इलेक्ट्रॉनिक रुपातील शेअर्सचे व्यवहार विनाविलंब होतात.<br>४) सदरमुळे, अनावश्यक खर्च, लिखा–पढी आणि कागदपत्रे करण्याची गरज राहत नाही.<br>५) गुंतवणूकदार आपल्या सर्व गुंतवणूकी आपल्या एकाच demat a/c मध्ये एकावेळी बघू शकतो व त्याचे नियोजन करु शकतो.<br>६) गुंतवणूकदारास त्यांचे गुंतवणूकीचे सर्व लाभ जसे की बोनस/राईटस् डिव्हीडन्ट आपोआप त्याच्या demat a/c द्वारे घर बसल्या मिळतात. तसेच गुंतवणूकीतून मिळणारे डिव्हीडन्ट आपोआप त्यांच्या demat a/c शी संलग्न bank a/c मध्ये जमा होतात. |




